‘मधुक्रांती-२०२१’



योगदान

पुरस्कार : विदर्भ विभाग (महिला उद्योजिका)



प्राजक्ता आदमणे

# ‘कस्तुरी’ मधाचा आश्वासक गोडवा

**प्राजक्ता आदमणे**
बी.फार्मसी, एम.बी.ए. (मार्केटिंग)
जि. गडचिरोली, महाराष्ट्र

**ग**डचिरोली येथील प्राजक्ता आदमणे यांनी पुण्यामधील बड्या कंपनीची नोकरी सोडून दुर्गम भागात मधमाशी पालनाचा व्यवसाय सुरु केला. या व्यवसायात त्यांनी नेत्रदीपक यश मिळविले असून त्या दर महिन्याला साडेतीन ते चार लाख रुपये कमवितात. त्यांचा हा व्यावसायिक प्रवास इतरांसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे.

प्राजक्ता आदमणे यांनी वयाच्या तिसाव्या वर्षी गडचिरोलीतील एक यशस्वी उद्योजिका अशी ओळख मिळवली आहे. बी. फार्मसी आणि एम.बी.ए. (मार्केटिंग) असे उच्चशिक्षण त्यांनी घेतले आहे. जीवनात वेगळं काही तरी करण्याच्या जिद्दीने पुणे शहरातील एका बड्या कंपनीतील नोकरी सोडून या गडचिरोलीत परतल्या.

नवीन काहीतरी करण्याची त्यांची प्रबळ इच्छा होती. त्यामुळे त्यांनी गडचिरोलीत मधोत्पादनाचा व्यवसाय सुरु करण्याचं ठरवलं. या व्यवसायासाठी आवश्यक असणारं रीतसर प्रशिक्षणही त्यांनी दिल्ली येथे घेतलं. मुळातच वनस्पतीशास्त्राची ओढ आणि गडचिरोली जिल्ह्यातल्या युवक- युवतींसाठी काही काम उभं करण्याची इच्छा यातून त्यांचा ‘कस्तुरी हनी’ प्रकल्प निर्माण झाला. फार कमी कालावधीतच त्यांनी ‘कस्तुरी हनी’ हा स्वतःचा ब्रँड बाजारात नावारुपास आणला.

गडचिरोली हा नक्षलग्रस्त जिल्हा असून नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध आहे. येथील आदिवासी जनतेला मागदर्शन करणारं कुणी नाही, या विचारातून प्राजक्ता यांनी आधी माहिती गोळा करणं सुरू केलं आणि नोकरी सांभाळत असतानाच त्यांनी मधमाशी पालन व्यवसाय सुरू केला. या विषयाचा अधिक अभ्यास केल्यानंतर व प्रशिक्षण घेतल्यानंतर त्यांनी नोकरी सोडली आणि या व्यवसायाला वाहून घेतलं.

या परिसरात खुर्सा येथे व्यवसाय सुरू करण्यासाठी प्राजक्ता यांनी सुमारे अडीच लाख रुपये गुंतवले आणि वर्षभरातच खर्च वजा जाता साडेतीन ते चार लाख रुपये मिळवले. मधविक्रीबरोबरच मधपेट्याही विकण्यासाठी त्या बेरोजगार युवक- युवतींना प्रेरित करत असतात, सल्ला देतात तसेच योग्य ती मदतही करतात. तसेच त्यांनी स्वतः सात तरुणांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. या तरुणांना प्रत्येकी पाच हजार ते सात हजार रुपये मासिक वेतन त्या देतात.

प्राजक्ता सांगतात की, मधाची मागणी वाढल्यावर, वेगवेगळ्या फुलांचे मध त्या- त्या फुलाचा सुवास मिसळून बनवणं सुरू केलं. मधुमेह आणि अन्य रोगांवर इलाज करण्यासाठी मधाचा उपयोग कसा करायचा, ही माहिती आयुर्वेदातून मिळवली आणि त्या- त्या प्रकारचे मध बनवायला सुरूवात केली. यासाठी ज्या ठिकाणी फुलोरा असतो, तिथे मधपेट्या स्थलांतरित करत राहावं लागतं, असंही त्यांनी सांगितले.

सूर्यफूल, तुती, जांभूळ, बोर अशा विविध झाडांच्या ठिकाणी मधमाश्यांच्या पेट्या ठेवल्या जातात. पेट्यांत जमा झालेला मध साफ करून बाटल्यांत भरला जातो. १०० ग्रॅमपासून १ किलोपर्यंत वजनाच्या मधाच्या बॉटल्स आपल्याकडे उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. मधाची ३८० रु. प्रतिकिलो दराने त्या विक्री करतात.

आता हा व्यवसाय त्यांनी राजस्थान राज्यांतील झालावाड येथे तसेच उत्तर प्रदेशात देखील सुरु केल्याने, तेथील युवकांनाही रोजगाराची संधी देणं त्यांना शक्य झालं आहे. अनेक पारितोषिकांनी सन्मानित झालेल्या प्राजक्ता आदमणे यांचं काम हा व्यवसाय करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी मार्गदर्शक आहे. ■

‘मधुक्रांती-२०२१’



**योगदान**

पुरस्कार : मराठवाडा विभाग



श्री. गणेश बुरकूल

# ‘ऋषिमध’ ब्रँडनेम ठरतंय लोकप्रिय


**गणेश विनायक बुरकूल**

**शिक्षण** : १२ वी पर्यंत, **वय** : ३५ वर्षे.

(मो. ९७६४९५२०६२/ ९९७०८७३६६२)

**पत्ता :** टाकळी माळी, ता.जि. औरंगाबाद


**औ**रंगाबाद जिल्ह्यातील टाकळी माळीचे श्री. गणेश बुरकूल मधमाशी पालन व्यवसाय २०११ सालापासून करीत आहेत. सध्या त्यांच्याकडे मधमाश्यांच्या १४० वसाहती आहेत.

मधमाशी पालन व्यवसाय करण्याचा त्यांचा प्रमुख उद्देश परागीभवन सेवेतून पीक उत्पादन वाढीस मदत करणे व त्यातून मध निर्मिती करणे, असा असल्याचे त्यांनी सांगितले. ते दरवर्षी मधाचे ५० ते ६० हजार किलो उत्पादन घेतात. सुमारे ९९ शेतकऱ्यांना भाडेतत्त्वावर मधमाश्यांच्या पेट्या देतात. वर्षाला सरासरी ४ ते ५ लाख रुपये उत्पन्न मिळते. कोरोना काळात सुद्धा १ ते २ लाख रुपये उत्पन्न मिळाले, असे त्यांनी सांगितले. डाळिंब, काकडी, कलिंगड, कांदा बीज, मोहरी, कारले, खरबूज, शेवगा इत्यादी पिकांसाठी ते परागीभवन सेवा देतात. मधाचे उत्पादन झाल्यानंतर विक्री व्यवस्था त्यांनी स्वत:चीच उभारलेली असून ‘ऋषिमध’ या ब्रँड नेमने ते विक्री करतात. हा व्यवसाय सुरू करण्यासाठी त्यांना १० पेट्या मराठवाडा पॅकेज अंतर्गत मिळाल्या असून, खादी ग्रामोद्योग मंडळाकडून त्यांनी रु.९०,००० कर्ज घेतले. रु. ४३००० अनुदान मिळाले. मधु-पेट्या वाढवणे, पिकांमध्ये परागीभवन करून उत्पादनवाढीसाठी शेतांत वसाहती ठेवण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करणे, तसेच आतापर्यंत महाराष्ट्रातील परागीभवनाबरोबरच इतर राज्यांत जाऊन अधिक मध उत्पादन घेणे हे त्यांचे भविष्यकालीन नियोजन आहे. हा व्यवसाय खूप चांगला आहे. नियोजनपूर्वक केला तर यात खूप मोठा वाव आहे. शैक्षणिक- आर्थिक दुर्बलता असतानाही आपली आर्थिक आणि सामाजिक पत याच व्यवसायामुळे उंचावली व देशभर ओळख निर्माण झाली, असा अभिप्राय त्यांनी दिला. ■

---

‘मधुक्रांती-२०२१’



**योगदान**

पुरस्कार : पश्चिम महाराष्ट्र



श्री. राहुल देवल

# उत्तर भारत भ्रमणातून वाढवला व्यवसाय


**श्री. राहुल शशिकांत देवल**

शिक्षण : डिप्लोमा इंजिनिरिंग, मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स. (वय : ४१)

(मो.नं. :९३७२७२०४००)

ता. मिरज, जि. सांगली.


श्री. राहुल देवल मधमाशी पालन व्यवसाय ६ वर्षांपासून करीत आहेत. मेलिफेराच्या ३०० आणि सातेरीच्या ५० वसाहती त्यांच्याकडे आहेत. शेतकऱ्यांना परागीभवन सेवा देऊन त्यांचे उत्पादन वाढवण्यास मदत करणे हा मधमाशी पालन व्यवसायाचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

दरवर्षी ते मधाचे सरासरी ८ ते १० टन उत्पादन घेतात. यासाठी महाराष्ट्रासह पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश या राज्यांत फिरतात. देवल शेतकऱ्यांना परागीभवनासाठी मधमाश्या देतात. त्यासाठी अंदाजे १००० वसाहतींची वर्षभरात विक्री करतात. डाळिंब, शेवगा, सूर्यफूल, कांदा इत्यादी पिकांसाठी ते सेवा पुरवतात. मधाचे उत्पादन झाल्यानंतर ‘देवल हनी’ हा स्वतः चा ब्रँड विक्री करून ते बाजारात पाठवतात. आयडीबीआय बँक व जिल्हा उद्योग केंद्र यांचे अर्थसाह्य- अनुदान त्यांना मिळाले.

मध पालकांचा एक मोठा गट स्थापन करून एकत्रितरित्या पुढे नेण्याचे त्यांचे भविष्यकालीन नियोजन आहे. या व्यवसायातून स्वार्थ, परमार्थ आणि देशकार्य सर्व एकाच वेळी साध्य करता येते, असे वैशिष्ट्य ते नमूद करतात. ■

‘मधुक्रांती-२०२१’



**योगदान**

**पुरस्कार : उत्तर महाराष्ट्र विभाग**

# मधाचे कुशल ट्रेडर तसेच मास्टर ट्रेनरही!



श्री. विलास दरोडे


**श्री. विलास देविदास दरोडे**

शिक्षण : राज्यशास्त्र, (वय : ३३)

(मो.नं : ९२८४९३६८१७) मु. हनुमंतपाडा, पोस्ट : भुवन तालुका : पेठ, जिल्हा: नाशिक


**श्री.** विलास दरोडे हे खादी ग्रामोद्योग मंडळामार्फत मास्टर ट्रेनर म्हणून कार्यरत असून, सन २०१४ पासून मधाचा व्यवसाय करत आहेत. पेठ तालुक्यात आग्या मध, सातेरी व फुलोरी या तीन जातींच्या वसाहती जास्त प्रमाणात आढळतात. म्हणून ते या तिन्ही जातींचे मध जमा करून व्यवसाय करतात. सह्याद्री पर्वतरांगांमध्ये मधमाश्यांच्या वसाहती जास्त प्रमाणात आढळतात, त्यामुळे मध जमा करण्यासाठी कोणताही खर्च येत नाही. विनाखर्च व्यवसाय सुरू करता येतो व उत्पन्नात वाढ करता येते, अशी माहिती त्यांनी दिली.

आपण नाशिक जिल्ह्यातूनच ७००-८०० किलो मध जमा करून १,३०,००० रू. पर्यंत वार्षिक उत्पन्न मिळवू शकतो. तसेच शेतकऱ्यांना मधमाश्यांच्या परागीभवनाविषयी माहिती देऊन शेतीच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी सातेरी मधमाशीच्या वसाहती ठेवता येतील, अशी प्रतिक्रिया त्यांनी नोंदवली. ते मधाचे उत्पादन घेतल्यानंतर पाव किलो, अर्धा किलो व १ किलोच्या रिकाम्या बाटलीत भरतात आणि त्र्यंबकेश्वर- नाशिकसारख्या शहरात नेऊन विकतात. शुद्ध व ताज्या मधामुळे ग्राहकसंख्येत वाढ होत जाते, असे त्यांनी सांगितले. आग्या मधमाशी पालन व्यवसायात सुरवातीपासून कुठलाही खर्च येत नाही. म्हणून कोणत्याही बँकेकडून कर्ज अनुदान घेण्याची गरज भासत नाही. तसे पाहता हा मध व्यवसाय बिनखर्चाचा आहे. वर्षानुवर्षे मधाच्या वसाहती जंगलात सापडतातच, म्हणून हा व्यवसाय बंद पडू शकत नाही, याकडेही दरोडे यांनी लक्ष वेधले. ■

---

‘मधुक्रांती-२०२१’



**योगदान**

**पुरस्कार : कोकण विभाग**

# स्वयंपूर्ण प्रयत्नांमधून उभारला मधु-उद्योग



श्री. नीलेश पोतदार


**श्री. नीलेश भालचंद्र पोतदार**

वय : ४२, शिक्षण : बी कॉम.

(मो.नं. : ८०९७४४११९३)

म्हसळा, तालुका : म्हसळा, जि. : रायगड


**श्री.** नीलेश पोतदार यांनी ‘सीबीआरटीआय’, पुणे येथे पाच दिवसीय मधुमक्षिका पालन प्रशिक्षण घेतले आहे. ‘आत्मा’- सातारा येथे त्याचप्रमाणे कृषी विज्ञान केंद्र, कोसबाड येथेही प्रशिक्षण घेतले आहे.

श्री. पोतदार २०१५ पासून मधमाशी पालन व्यवसाय करीत आहेत. त्यांच्याकडे सध्या मेलिफेरा या जातीच्या जवळपास शंभर वसाहती आहेत. मधमाशी पालन व्यवसाय करण्याचा त्यांचा प्रमुख उद्देश परागीभवन सेवा देणे व मध गोळा करणे असा आहे. ते दरवर्षी ४ ते ५ टन मधाचे उत्पादन घेतात. या व्यवसायासाठी पंजाब, हरयाणा, हिमाचल प्रदेश, राजस्थान या राज्यांमध्ये फिरतात. त्यांच्या परागीभवन सेवेत लिची, नासपती या पिकांचा समावेश आहे. मधाचे उत्पादन झाल्यानंतर ते घाऊक प्रमाणात व्यापाऱ्यांना देतात तसेच किरकोळ स्वरुपात स्वत:च्या ब्रॅण्ड नेमने विक्रीही करतात. या व्यवसायासाठी त्यांनी कोणत्याही बँकेचे अर्थसाह्य घेतलेले नाही. तसेच त्यांना कोणाकडूनही अनुदान मिळालेले नाही. मधुमक्षिका पालनासाठी आपल्या जिल्ह्यात सेटअप उभा करणे आणि रिटेल विक्रीवर भर देणे, असे त्यांचे पुढील नियोजन आहे. या व्यवसायाचा मुख्य उद्देश परागीभवन सेवा हा असावा. मधाचे उत्पादन घेऊन आर्थिक लाभ मिळविण्यासाठी हा व्यवसाय अतिशय उत्तम असल्याने, मधुमक्षिका पालन व्यवसायाचे प्रशिक्षण घेऊन हा व्यवसाय बेरोजगार तरुणांनी अवश्य करावा, असे ते म्हणतात. ■

'मधुक्रांती-२०२१'



## योगदान

पुरस्कार : संस्थात्मक श्रेणी

# सिराना मीड्सची 'मधाळ' वाटचाल



डॉ. अश्विनी टिळे डॉ. योगिनी बुधकर

**सिराना मीड्स,** सिन्नर
**डॉ. अश्विनी टिळे, डॉ. योगिनी बुधकर**
(मो.नं. ९८९२७७९६५६ )
सी-१२५, माळेगाव औद्योगिक वसाहत, सिन्नर, जि. नाशिक

**अ**लिकडे 'सिराना मीड्स' च्या माध्यमातून देशभर परिचित झालेल्या डॉ. अश्विनी टिळे आणि डॉ. योगिनी बुधकर यांचा संशोधन प्रवास अतिशय लक्षवेधी असा आहे. या दोघींनी मुळात पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले, ते फार्मसी आणि झुऑलॉजीमध्ये. मात्र पुढे व्यवसाय निवडला तो मधापासून अल्कोहोलयुक्त पेय तयार करण्याचा! या 'हनी-मीड'ला सर्वसाधारणपणे 'हनी-वाईन' म्हटलं जातं.

प्रारंभी नाशिकमध्ये राहिलेल्या अश्विनी टिळे नंतर एम.टेक. तसंच पीएच.डी.(बायोप्रोसेस टेक्नॉलॉजी) करण्यासाठी मुंबईत माटुंग्याच्या 'यूडीसीटी'मध्ये दाखल झाल्या. त्यावेळी बायोटेक्नॉलॉजीत डॉक्टरेट करण्यासाठी योगिनी बुधकरही तेथे रुजू झाल्या. दोघीही एकाच विभागात संशोधन करीत असल्याने परिचय अधिक दृढ झाला, स्नेह जुळला. पर्यावरण तसंच मधमाश्यांबद्दल आत्मीयता असणाऱ्या योगिनी यांच्याशी वारंवार होणाऱ्या चर्चेतून, एखाद्या वैशिष्ट्यपूर्ण व्यावसायिक संकल्पाची बीजे अश्विनी यांच्या मनात तिथेच अंकुरित होऊ लागली. दरम्यान पोस्ट डॉक्टरेटसाठी त्या कॅनडाला जाऊन आल्या. त्यानंतर दोघींनी केलेल्या विचार विनिमयातून 'हनी-मीड'चं उत्पादन करण्याचं निश्चित झालं.

याची फलश्रुती म्हणून माळेगाव एम.आय.डी.सी., सिन्नर, जि. नाशिक येथे हा प्रकल्प जुलै २०१९ मध्ये सुरू झाला. या संकल्पनेच्या मागची मुख्य प्रेरणा मानवाला पूर्वीपासून ज्ञात असलेलं हे सर्वात जुनं 'मधुमद्य' पुन्हा ग्राहकप्रिय करणं ही आहे, असं डॉ. अश्विनी आणि डॉ. योगिनी यांनी नमूद केलं. आणखी एक तितकाच महत्त्वाचा उद्देश म्हणजे, या माध्यमातून मधमाशी पालन उद्योगाला पाठबळ देणं. हिमालयातील वनसंपदेसह महाराष्ट्राच्या पश्चिम घाट परिसरातून स्थानिक पातळीवर उत्पादित केलेली फळे आणि मध यांच्या मिश्रणातून (ब्लेंडिंग) विविध स्वादांची प्रक्रिया-पेये (हनी-मीड बीव्हरेजेस्) 'सिराना'द्वारे तयार केली जातात. या प्रकल्पामुळे स्थानिक फळ उत्पादक, मधमाशीपालक यांना बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. 'सिराना मीड्स' ने एक प्रकारे मधमाश्या पाळणाऱ्यांसह फळ उत्पादकांना हमखास व्यवसायाचे साधन मिळवून दिले आहे; तसेच विविध रोजगार संधीही निर्माण केल्या आहेत.

या मीड मॅन्युफॅक्चरिंग प्लँटची उभारणी करण्यासाठी उत्पादन शुल्क मंत्रालय तसेच अन्य शासकीय नियामक संस्थांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन सहकार्य केले, असे डॉ.अश्विनी यांनी आवर्जून नमूद केले.

अल्कोहोलयुक्त पेय उद्योगातील या नवीन क्षेत्रात पदार्पण करताना, मुख्य अडथळा होता, तो म्हणजे मध आंबवण्याची परवानगी मिळविणे! या संदर्भात सरकार दरबारी पाठपुरावा करताना आम्हाला तब्बल नऊ महिन्यांचा कालावधी लागला, परंतु त्यानंतर रीतसर अनुमती मिळाली. 'साखरेच्या नैसर्गिक स्रोतां' पैकी एक म्हणून मध आंबवण्याची परवानगी देणारा नवीन जी.आर. एप्रिल २०१७ मध्ये संमत झाला, असेही डॉ.अश्विनी यांनी सांगितले.

आमचे उत्पादन शंभर टक्के नैसर्गिक असून, कोणतेही कृत्रिम रंग आणि स्वाद यात वापरलेले नाहीत असा निर्वाळा देखील 'सिराना' च्या या कल्पक संस्थापकांनी दिला. तसंच ग्राहकांनी दिलेला प्रतिसाद, प्रतिक्रिया आणि सूचनांविषयी आपण स्वागतशील असल्याचा अभिप्रायही नोंदवला. ■

'मधुक्रांती-२०२१'



**योगदान**

**पुरस्कार : विस्तारकार्य**

# मधमाशी पालन प्रसाराचे अखंड विद्याव्रत!

**डॉ. भालचंद्र बाबूराव वायकर**
प्रोफेसर, झुऑलॉजी विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद



डॉ. भालचंद्र वायकर

जैवतंत्रज्ञान विभाग, नवी दिल्ली यांच्या आर्थिक सहकार्यातून औरंगाबाद जिल्ह्यातील आठ तालुक्यांमध्ये मधमाशी पालनाच्या मोठ्या प्रमाणातील प्रचार- प्रसाराचे कार्य डॉ. भालचंद्र वायकर यांनी केले. शेतकरी मासिक, ग्रामीण युवक, महिला बचत गट यांच्या माध्यमातून परागीभवनाद्वारे पिकांची उत्पादनवाढ तसेच स्वयंरोजगार निर्मिती या विषयावर भर दिला.

डॉ. वायकर यांनी प्रथमच विद्यापीठाच्या आवारामध्ये मधमाशी पालन सुरू करून प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. यासाठी ५५ प्रशिक्षण कार्यक्रमातून २५९० शेतकऱ्यांना मधमाशी पालनाचे प्रशिक्षण दिले. यातून त्यांनी ३०० शेतकऱ्यांची निवड करून त्यांना मधमाशी पालनाबद्दल सविस्तर प्रशिक्षण दिले.

परागीभवनासाठी मधमाशीचा वापर केला तर उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होते हे दाखविण्यासाठी त्यांनी एकूण २० पिकांची निवड केली आहे. त्यासाठी त्यांनी मधमाश्यांच्या १८४ वसाहती शेतकऱ्यांकडे दिल्या. मेलिफेरा तसेच सातेरी मधमाश्यांच्या वसाहती देत असताना फळझाडे, तेलबिया, कडधान्ये तसेच कांदा, बीजोत्पादन यावर विशेष भर दिला. मधमाश्यांच्या वसाहतींचा पिकांमध्ये वापर केल्यामुळे डाळिंब ५३४९ टक्के, मोसंबी ७१.०१ टक्के, पेरू ४४.१८ टक्के, कांदा बीजोत्पादन ५६.८० टक्के, लिंबू ६४.२९ टक्के, तूर ६४.८२ टक्के, सोयाबीन ७३.८० टक्के, मोहरी ८५.४८ टक्के, कापूस ३८.८० टक्के, सूर्यफूल १०० टक्के तर शेवगा ५५.४७ टक्के याप्रमाणे उत्पादनात वाढ झाली. याबरोबरच ग्रामीण भागातील युवकांना रोजगारही उपलब्ध झाला.

मागील तीन वर्षे मधमाशी पालनाबद्दल मोठ्या प्रमाणात कार्य करत असताना, या व्यवसायावर ९ शासकीय लेख प्रसारित केले. वृत्तपत्राच्या माध्यमातून मधमाशी पालनाचा प्रचार करण्यासाठी लेख लिहिले. तसेच १० यू ट्यूब प्रोग्रॅमही प्रसारित करण्यात आले. डॉ. भालचंद्र वायकर यांचे मधमाशी प्रचार- प्रसाराचे कार्य खरोखरच गौरवास्पद आहे. ■

## मधमाशीला जगवा, नाहीतर काय होईल ते पाहा!



मधमाशी असेल तर पोटभर जेवण...



मधमाशी असेल तर भरघोस शेती उत्पादन...



मधमाशी नसेल तर अर्धपोटी राहाणं...



मधमाशी नसेल तर अन्नधान्याची टंचाई...